| | |
|---|---|
| **PUBLICATION** | Prabhat |
| **DATE** | August 30th, 2017 |
| **PAGE NO** | 03 |
| **Edition** | Pune |

# १ सप्टेंबरपासून रंगणार 'लिफ्फी' महोत्सव

**पुणे** – पहिल्या लोणावळा अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला (लिफ्फी) मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर, यंदा सुद्धा लोणावळ्याच्या निसर्गरम्य वातावरणामध्ये प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे विविध प्रकारचे चित्रपट उपलब्ध होणार आहेत. यावर्षी १ ते ३ सप्टेंबरदरम्यान लिफ्फीचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रपटांच्या चाहत्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या ३२ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपटांची मेजवानी या महोत्सवात मिळणार आहे. यामध्ये हम साथ साथ है, हम आपके है कौन, आय एम कलाम, अंदाज अपना अपना, जलपरी, द डेझर्ट मरमैड, स्वर्ग, छोटा सिपाही, रसेल मॅडनेस, मंकी अप, द गोल, माय लकी एलिफंट आदींचा समावेश आहे. अल्ट्रा मीडिया अँड एन्टरटेनमेंट प्रा. लि., राजश्री प्रोडक्शन, चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया, के सेरा सेरा, विनय पिक्चर्स आणि स्माइलफाउंडेशन यांनी हा महोत्सव आयोजीत केला आहे.